**प्रेस नोट दि.२२/०६/२०१९**
**विश्रांतवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**सतर्क बीट मार्शलने बेवारस लेडीज पर्स शिताफीने चेक करुन महीलेस परत दिली.**

आज दिनांक २१/६/२०१९ रोजी धानोरी बीट मार्शल वरील कर्मचारी पो ना मुधोळकर व पो ना साबळे तसेच डयुटी अंमलदार पो हवा बरडे हे पेट्रोलिंग फिरत असताना त्यांना परांडेनगर येथे रोडचे कडेला एक बेवारस लेडीज पर्स पडलेली मिळून आलेने त्यांनी ती प्रथम काठीने ढकलून त्यात संशयीत काही नाही याची. खात्री करुन ती ताब्यात घेतली .असता त्यामध्ये २५,०००/- रुपये रोख रक्कम होती. त्या पर्समध्ये एक मोबाईल नंबर मिळून आलेने त्यवर संपर्क केला असता महिला नामे साजिया सिकंदर मन्सुरी रा. परांडेनगर धानोरी पुणे यांनी उचलला व त्यांची पंर्स हरविलेली शोधत असलेचे सांगितले त्यांना लागलीच चौकीस बोलावून घेऊन त्यांचे रकमेची खात्री करुन सदरची मिळालेली पर्स खात्री करून त्यातील २५,०००/- रुपये रोख रकमेसह ताब्यात देण्यात आली आहे.त्यावेळी सदर महिलेने पर्स व पैसे मिळवेन दिलेने पोलीसांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले आहेत.

सदर ची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हवा. बरडे ,पो विनोद मुधोळकर,पो ना नितीन साबळे विश्रांतवाडी पोलीस स्टेशन यांनी केली आहे.